15-09-2024-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 9/14/2024 11:53 PM Page 1



# सायबर गुन्ह्यांपासून सतर्क राहा

## आगरवाडा सार्वजनिक गणेशोत्सवात पोलिसांचे आवाहन

टीम दैनिक हेराल्ड



आगरवाडा : सार्वजनिक गणेशोत्सवात सायबर गुन्ह्याबाबत जनजागृती करताना उपनिरीक्षक परेश काळे, उपनिरीक्षक प्रतीक गारुडी व अन्य.

**पेडणे, दि. १४ :** सायबर गुन्हेगारीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशावेळी नागरिकांनी सतर्क राहून स्वतःला सायबर गुन्हेगारापासून आपली फसवणूक होणार नाही याची खबरदारी घ्यायला हवी, असे मांद्रे पोलिसांनी आगरवाडा सार्वजनिक गणेशोत्सवात आयोजित केलेल्या सायबर जनजागृती कार्यक्रमात केले.

आगरवाडा सार्वजनिक गणेशोत्सवात आयोजित केलेल्या सायबर जनजागृती कार्यक्रमाच्या वेळी मांद्रे पोलिस स्थानकाचे पोलिस उपनिरीक्षक परेश काळे, पोलिस उपनिरीक्षक प्रतीक गारुडी, महिला कॉन्स्टेबल सलोनी नाईक, कॉन्स्टेबल ॲलिस्टर डिसोझा, समीर गोंधळी, राजेश पाडलोस्कर, कन्हैय्या गोवेकर आदी उपस्थित होते.

यावेळी जनजागृती करताना त्यांनी सांगितले आज सायबर गुन्हे घडवून आणणारे आपल्याशी संपर्क साधून आर्थिक भुर्दंड घालतात, सहज फसवतात अशावेळी आपला बँक अकाऊट नंबर किंवा इतर माहिती कुणाकडे शेअर करू नका, असा निनावी फोन आल्यास १९३० या हेल्पलाईनवर संपर्क करा. त्यासाठी एखादा व्यवहार करताना नेटकऱ्यांनी काही बंधने घालून घ्यायला हवी. खऱ्या-खोट्याची खात्री करूनच पुढील पावले उचलायला हवीत, असे सांगितले

सुरूवातीला मंडळाचे सचिव सखाराम नागवेकर यांनी स्वागत केले. हेमंत गोसावी यांनी आभार मानले.

# सदर सार्वजनिक गणेशाचे सुदीन ढवळीकर यांनी घेतले दर्शन

टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १४ :** फोड्यांचा राजा सदर सार्वजनिक श्रीगणेशोत्सव उत्सवाला गुरुवारी १२रोजी राजाचे वीजमंत्री सुदीन ढवळीकर यांनी भेट देऊन श्रीचे दर्शन घेतले.त्यांच्या सोबत माजी सरपंच राजेश कवळेकर, सुखानंद कुर्पासकर उपस्थित होते.यावेळेस मंडळाचे दिलीप धोपेश्वरकर,अरुण गुडेकर, संगम बांदोडकर,जयवंत आडपईकर,रमेश वंसकर, अध्यक्ष सतीश सबनीस,सचिव सोमनाथ नाईक,सुनील देसाई,राया बोरकर,मनोहर जाधव,शशीकांत नाईक, संयुक्ता बांदोडकर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी सुदीन ढवळीकर यांनी या गणेशोत्सवतील लहानपणीच्या काही आठवणी सांगितल्या ते हायस्कूल मध्ये शिकत असतांना शारीरिक शिक्षक त्याना व इतर अनेक विद्यार्थ्यांना घेऊन येत होते व मंडपातील कचरा घोळा करण्यास सांगत होते.त्यामुळेच या गणेशोत्सवा मंडळांशी माझे नाते आहेत.या गणेशोत्सव मंडळाला मोठी परंपरा असून मंडळाचे कार्य चांगले चालले आहे असे ते बोलले.अध्यक्ष सतीश सबनीस यांनी स्वागत केले तर दिलीप धोपेश्वरकर यांनी आभार मानले.



फोंडा : सदर गणपती उत्सवात वीजमंत्री सुदीन ढवळीकर, राजेश कवळेकर, सुखानंद कुर्पासकर, दिलीप धोपेश्वरकर, जयवंत आडपईकर, संगम बांदोडकर, अरुण गुडेकर व इतर.

## पान १ वरून

### राज्यात दोन अपघातांत ४ ठार

अपघाताचा पंचनामा केला. दरम्यान, अपघाताला कारणीभूत ठरलेल्या ट्रक चालक आणि रिक्षा चालकाला मांद्रे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अपघाताची घटना नेमकी कशी घडली, याबाबत तपास मांद्रे पोलिस करीत आहेत.

### नानोड्यात भीषण अपघात; दोन युवक ठार

आमदार डॉ. शेट्ये यांनी त्वरित अपघात घडल्याची माहिती १०८ व डिचोली पोलिस स्थानकाला दिली. पोलिस त्वरित घटनास्थळी दाखल झाले. डिचोली पोलिस स्थानकाचे उपअधीक्षक सागर एकोस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक दिनेश गडेकर आणि पोलिस उपनिरीक्षक विराज धावस्कर पुढील तपास करीत आहे. उशिरा पंचनामा करण्यात आला.

### कॅन्सरच्या प्रमाणाबाबत मुख्यमंत्र्यांना चिंता

पाच टक्के लोकांमध्ये कॅन्सरची लक्षणे आढळली. ही बाब काळजी करण्यासारखे असून लोकांनी दुर्लक्ष न करता पूर्व चाचणीसाठी तपासणी करून घ्यावी, लक्षणे आढळल्यास त्यांनी तातडीने तपासणी करून घेण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

साखळी हॉस्पिटलमध्ये कॅन्सर स्क्रीनिंग अभियान अंतर्गत मोबाईल कॅन्सर तपासणी कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. गोवा मेडिकल कॉलेज हॉस्पिटलतर्फे या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला असून यावेळी डॉ. जगदीश, डॉ. मेधा साळकर, गोपाळ सूर्लीकर, नगराध्यक्ष सिद्धी पोरोब व इतर मान्यवर उपस्थित होते.

ग्रामीण भागात लोक आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. तपासणीला टाळाटाळ करतात. त्यामुळे राज्य सरकारने प्रत्येक गावात मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून आधुनिक पद्धतीची आरोग्य तपासणी असणारी यंत्रणा हाती घेऊन वर्षभरात संपूर्ण राज्यातील लोकांची पूर्वचाचणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. गितले. डॉ. जगदीश यांनी या अभियानाची सविस्तर माहिती दिली. तसेच पहिल्या तीन विभागातील तपासणी पाचशे अठरा रुग्णांमधून पाच टक्के रुग्णांना लक्षणे दिसून आल्याने याबाबत लोकांनी अधिक जागृत होणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले.

### गोवा काँग्रेसची नामी शक्कल !

त्यांचा भाजपमध्ये जाणे हा विकासापेक्षा वैयक्तिक फायद्यासाठी प्रेरित असल्याचा दावा त्यांनी केला. हे पक्षांतर म्हणजे लोकशाहीचा विश्वासघात आहे. आम्हाला आणि गोव्यातील लोकांना त्यांच्या कृत्याची लाज वाटते, असे आलेमाव म्हणाले.

गोव्यातील पर्यावरणाचा ऱ्हास, मोठ्या प्रमाणावर होत असलेला भ्रष्टाचार आणि जमीन विक्रीकडे लक्ष वेधून भाजप हा विघातक तयार करणारा कारखाना म्हणून काम करत असल्याचा आरोपही आलेमाव यांनी केला. पक्षांतरामुळे अनेक मतदारांचा अपमान झाल्याची भावना आमदार एल्टोन डिकॉस्टा यांनी व्यक्त केली. मतदारांनी असे पक्षांतर पुन्हा होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे आणि जबाबदारांना धडा शिकवला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

साव्हियो कुतिन्हो यांच्यासह इतर अनेक काँग्रेस नेते रॅलीत सामील झाले आणि त्यांनी निवडणूक बदलाच्या आवाहनाला प्रतिध्वनी दिली, पक्षांतराने उपस्थित केलेल्या समस्यांचे निराकरण करण्याच्या पक्षाच्या बांधीलकीला बळकटी दिली.

# आराडीमध्ये युवकाची आत्महत्या

टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. १४ :** आराडी, सुकूर येथे युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला. निरीक्षक राहुल परब यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे आराडी सुकूर येथील शिवनाथ अंकुश गावकर (२२, मूळ बेळगावी, कर्नाटक) या युवकाने आपल्या राहत्या घरी सिलिंग पंख्याला लटकून गळफास घेतल्याची घटना उघडकीस आली. मयत शिवनाथ याचे वडील गावाहून परतल्यावर त्यांना शिवनाथ पंख्याला लोंबकळत असल्याचे दिसले. त्यांनी पर्वरी पोलिस स्थानकात हा प्रकार सांगितला. महिला उपनिरीक्षक लौरीन सिकेरा यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृतदेह शवचिकित्सेसाठी गोमेकॉमध्ये पाठवण्यात आला असता डॉक्टरांनी श्वास कोंडल्यामुळे

मृत्यू झाल्याचे निदान केले. पुढील निरीक्षणासाठी मयताचा व्हिसेरा राखून ठेवण्यात आला आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# राज्यातील गणेश मंडळांना एकत्र आणणार

## मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत साखळीत सत्कार, गौरव सोहळा उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड



साखळी : सत्कारमूर्तींसोबत मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत, सिद्धी पोरोब व मंडळाचे पदाधिकारी.

**डिचोली, दि. १४ :** देश विकसित होणार असेल तर राजकारण्यांनी म्हटले म्हणून पॉलिसी करून होणार नाही. त्यासाठी प्रत्येकाने योगदान व जबाबदारी घेतली तरच देश विकसित होणे शक्य आहे. राज्यातील सर्व गणेश मंडळाच्या समित्यांना एकत्र आणून सामाजिक योगदान देण्याबाबत विचार करण्यात येणार आहे. समाजात संस्कृती संवर्धनचे काम करणे अपेक्षित आहे. त्यासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी केले.

मंडळातर्फे आयोजित करण्यात आलेला सत्कार व गौरव सोहळा गणेश मंडळ व्यासपिठावर आयोजित केला होता. या सोहळ्यास मुख्यमंत्री प्रमुख पाहुणे म्हणून तर नगराध्यक्ष सिध्दी प्रभू, उपेंद्र कर्पे, राधिका कामत सातोस्कर, उत्सव समिती अध्यक्ष धिरेश पेडणेकर, शैलेश काणेकर, सत्कारमूर्ती आनंद नाईक हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

साखळीत अनेक प्रकल्प राबवले जाात आहे. साखळीत बदल झाला असून विकासात पायाभूत व मान व संसाधान क्षेत्रात विकासाला गती दिली जात आहे. केजी ते पिजीपर्यंत शिक्षण सुविधा उपलब्ध केली आहे. पालिका विभागात लवकरच अर्बन मिशन महिलासाठी राबवण्यात येणार आहे. सार्वजनिक गणेश मंडळानी वर्षभर काम करावे. नितळ सुंदर गोवासाठी काम करावे. गणेश हा स्वच्छतेची देवता आहे. प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती बंद कराव्यात. गणेश ही स्वयंपूर्णतेची देवता असल्याने त्यासाठी गणेश भक्तांनी योगदान द्यावे, असे आवाहन डॉ. सावंत यांनी केले.

धीरेश पेडणेकर यांनी स्वागत तर शैलेंश काणेकर यांनी प्रास्ताविक केले. उपेंद्र कर्पे यांनी मंडळाचा अहवाल सादर केला. नगराध्यक्ष सिद्धी प्रभू यांनी साखळीतील विकासाला मुख्यमंत्री डॉ. सावंत यांचे मोठे योगदान लाभत असल्याचे सांगितले.

या सोहळ्यात माजी नगराध्यक्ष आनंद गोपी नाईक यांचा मुख्यमंत्री सावंत यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. एमबीबीएस सर्जिकल ऑन्कॉलॉजी डॉ. अविनाश पुजारी, मार्शल आर्टमध्ये राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक विजेते अजय दिपक कारबोटकर, एम. ए. कोकणी विषयात सुवर्णपदक विजेत्या स्नेहा सबनीस व संशोधक संगणक विज्ञानात पीएचडी केलेल्या रूचा शैलेंद्र पराडकर यांचा मुखध्यापकांकडून गौरव करण्यात आला. आनंद नाईक, स्नेहा सबनीस यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी गणेश मंडळातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेते तसेच शाळांत परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा डॉ. सावंत यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन श्याम पेडणेकर, राजेश वझरिकर यांनी केलें राधिका कामत सातोस्कर यांनी आभार मानले

# आंबिये महाविद्यालयात गणेश चतुर्थी बाजार



पेडणे : गणेश चतुर्थी बाजाराला भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांसमवेत संचालक भूषण सावईकर, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर व मान्यवर.

टीम दैनिक हेराल्ड

**वाणिज्य विभागाचा पुढाकार, २२ स्टॉल्सची मांडणी**

**पर्वरी, दि. १४ :** संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथील वाणिज्य असोसिएशनच्या सहकार्याने वाणिज्य विभागाच्यावतीने सकाळी ९ ते ४ या या वेळेत गणेश चतुर्थी बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेचे गुण विकसित व्हावेत आणि विद्यार्थी जनसामन्यांशी जोडले जावेत, तसेच विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये वृद्धिंगत व्हावीत हे हेतू डोळ्यांसमोर ठेवून या चतुर्थी बाजाराचे आयोजन करण्यात आलेले होते.

या बाजारात विद्यार्थी, बचत गट आणि स्थानिक विक्रेत्यांनी एकूण २२ स्टॉल्सची मांडणी केलेली होती. या गणेश चतुर्थी बाजारात माटोळी उत्पादने, पारंपरिक मिठाई, पूजेसाठी आवश्यक वस्तू आणि सजावटीच्या वस्तू यांचा समावेश होता. यावेळी उद्घाटन सत्राला प्रमुख पाहुण्या म्हणून संजीवनी परब यांच्यासह महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर व शिक्षक वर्ग उपस्थित होते.

**शिक्षण संचालक भूषण सावईकर यांचा विद्यार्थ्यांशी वार्तालाप**

या गणेश चतुर्थी बाजाराला उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी वार्तालाप केला. तसेच विद्यार्थ्यांनी व्यावसायिक कौशल्य आत्मसाद करण्यासाठी अशा उपक्रमात नियमित सहभागी होण्याचे आवाहन केले.

# नियती मळगांवकर यांना ‘मिसेस डेफ इंडिया २०२४’चा किताब

**सौंदर्यस्पर्धेत सहभागी होण्याचे एका गृहिणीचे स्वप्न झाले साकार**

टीम दैनिक हेराल्ड



**म्हापसा, दि. १४ :** येथील नियती मळगावकर यांनी हल्लीच हैदराबाद येथे आयोजित मिसेस डेफ इंडिया २०२४ स्पर्धेत संपूर्ण गोव्यासाठी अभिमानास्पद अशी कामगिरी बजावत स्पर्धेच्या विजेतेपदाचा मुकुट पटकावला. हा पुरस्कार वैयक्तिक माझ्यासाठी आणि आजवर प्रत्येक पावलावर मला आधार, पाठबळ देणाऱ्या माझ्या कुटुंबियांसाठी अनमोल असा आहे. समाजाच्या विविध क्षेत्रांत पुढे येऊन यशस्वी भरारी घेण्यासाठी डेफ व्यक्तींना माझ्या या कामगिरीतून नक्कीच प्रेरणा मिळेल, अशी मला आशा आहे, अशी भावना नियती मळगांवकर यांनी पुरस्कार मिळाल्यानंतर व्यक्त केली.

नियती यांच्या विजयी कामगिरीचे कौतुक करताना राज्याचे दिव्यांगजन आयुक्त गुरुप्रसाद पावसकर म्हणाले, नियती, पाठिंबा देणारे त्यांचे कुटुंबीय आणि गोव्यातील आम्हा सर्वांसाठी हा खरोखर अभिमानाचा क्षण आहे. दिव्यांग व्यक्तींना कोणत्याही क्षेत्रात चमक दाखवण्यासाठी नियतीच्या माध्यमातून आणखी एक प्रेरणास्थान मिळणार आहे. आपल्या स्वप्नांच्या वाटेत श्रवण मर्यादा त्यांनी येऊ दिली नाही.

या जेतेपदामुळे मला नवा आत्मविश्वास मिळाला आहे, प्रयत्न केले तर यश मिळते हे या कामगिरीतून मला जाणवले आहे. अनुभव आणि आत्मविश्वास मिळाल्याने धन्य पावल्याची अनुभूती मला मिळत आहे, असे नियती सांगतात.

पर्वरी येथील संजय सेंटर फॉर स्पेशल एज्युकेशनमधून बारावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर नियती यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, गोवामध्ये बेकरी या विषयांत व्यावसायिक शिक्षण पूर्ण केले. शिक्षणानंतर घरातूनच त्यांनी बेकरीचा व्यवसाय सुरू केला आणि ग्राहकांच्या मागणीनुसार त्या स्पेशल केक पुरवतात.

नियती यांच्या मिसेस डेफ इंडिया २०२४ स्पर्धेतील या यशाबाबत गोवा असोसिएशन ऑफ डेफद्वारेही आनंद व अभिमान व्यक्त केला.

आपल्या या यशामधून इतर डेफ महिलांना प्रेरणा मिळेल आणि आपले स्वप्न, उद्दिष्ट साकारण्यासाठी त्यांचे प्रयत्न वाढतील आणि त्या यशस्वी होतील, अशी भावना नियती यांनी व्यक्त केली.

# सुनंदाबाई बांदोडकर विद्यालयात हिंदी दिन उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड




पर्वरी : हिंदी दिनानिमित्त उपस्थित सहाय्यक अध्यापिका श्वेता गोवेकर, मुख्याध्यापिका ज्योती चिपळूणकर व शिक्षक एकनाथ यमकर. (शेखर वायंगणकर)

**पर्वरी, दि. १४ :** साल्वादोर-दो-मुंद येथील श्रीमती सुनंदाबाई बांदोडकर विद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर गोवा विद्यापीठाच्या सहाय्यक अध्यापिका श्वेता गोवेकर, शाळेची मुख्याध्यापिका ज्योती चिपळूणकर, हिंदी शिक्षक एकनाथ यमकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून झाली. मुख्याध्यापिका ज्योती चिपळूणकर यांनी प्रास्ताविक केले. मधुरा नाईक हिने हिंदी दिवसाचे महत्त्व सांगितले. साक्षी विश्वकर्मा हिने हिंदी भाषेवर आधारित कविता सादर केली. त्यावेळी विद्यार्थ्यांनी केलेल्या भिंतीपत्रकाचे पाहुण्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

हिंदी भाषा आमची राष्ट्रभाषा आहे, आपण लेखन करताना त्यात चुका करू नये, असे प्रमुख पाहुण्या श्वेता गोवेकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या. शिक्षक एकनाथ यमकर यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजा कुंडईकर यांनी केले तर आभार शिक्षिका काजल शिंदे यांनी केले. शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दामोदर उच्च माध्यमिकमध्ये वैद्यकीय आणि जागृती शिबिर

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.१४ :** मठग्रामस्थ हिंदू सभेच्या श्री दामोदर उच्च माध्यमिक विद्यालय विज्ञान शाखा कोंब, मडगाव यांच्या पालक शिक्षक संघटनेने कै. श्री शिरीष पै काणे यांच्या स्मरणार्थ शाळेच्या सभागृहात दोन दिवसीय वैद्यकीय आणि जागृती शिबिर आयोजित केले.

शिबिराची सुरुवात पारंपारिक दीप प्रज्वलित करून करण्यात आली. उद्घाटन सत्रात मठग्रामस्थ हिंदू सभेचे अध्यक्ष भाई नाईक यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनी सांगितले की, हे शिबिर दिवंगत शिरीष पै काणे यांचा स्वप्न प्रकल्प होता. त्यांनी विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिबिरात सहभागी होण्याचे आणि डोळे तपासणी, दंत तपासणी, न्यूरो तपासणी आणि फिजिओथेरपी तपासणी यासारख्या विविध वैद्यकीय सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना ड्रग्जला नाही म्हणण्याचे आवाहनही प्रखरपणे केले.

डॉ. चंद्रकांत हिरेमठ यांनीही या प्रसंगी भाषण केले आणि आजच्या काळात वैद्यकीय जागरूकतेचे महत्त्व स्पष्ट केले. या प्रसंगी व्यवस्थापन कार्यकारी श्रीमती रीमा कुंदे, डॉ. सतींद्र देसाई आणि डॉ. चार्लोट फालेरो उपस्थित होते. शिबिराचे आयोजन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष ॲड्रियन टोरेस आणि हर्षद नाईक उपस्थित होते. इतर पालक शिक्षक कार्यकारी सदस्यांमध्ये डॉ. रोविना फर्नांडिस आणि मनोज कोरगावकर हेही उपस्थित होते.

डॉ. सोनल सावंत यांनी मासिक पाळी स्वच्छता, आरोग्य आणि निरोगी जीवनशैलीबद्दल जागरूकता यावर प्रभावीपणे सत्र घेतले. उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राजीव देसाई यांनी आभार मानले. सूत्रसंचालन पालक शिक्षक संघाचे सचिव किरण कम्मार यांनी केले.

**व्यवसाय**

कुकिंग-ऑइल साइड बिझनेस. इन्व्हेस्टमेंट ०९ ते १३% बिलिंगसह मासिक उत्पन्न निश्चित करा, कोणताही धोका नाही. संपर्क : ९५९४४४५००९

**पाहिजेत**

Agsar Paints looking a competitive and trustworthy field sales executive. graduation not mandatory. freshers also apply. send cv:resumes@agsar.net call:9840691864

# पुढच्या वर्षी लवकर या...!

## साळ येथे सात दिवसाच्या गणरायाचे थाटात विसर्जन

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, साळ दि. १४ :** 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात राज्यात सात दिवसांच्या घरगुती गणपतींचे गावच्या नदीत गणेशमूर्तींचे शुक्रवारी विसर्जन करण्यात आले. सात दिवसांच्या गणपतींसह गौरी-गणपतींचे वाजत गाजत, फटाक्यांची आतषबाजी करीत विसर्जन करण्यात आले. विसर्जनस्थळी आरती, गाऱ्हाणे घालत पुढच्या वर्षी लवकर, या अशी साद गणरायाला घालण्यात आली. शुक्रवारी रात्री साडे अकरा वाजेपर्यंत येथील सात दिवसाच्या गणपतीचे उत्साहात थाटात विसर्जन करण्यात आले.

संध्याकाळी विविध पुरोहिताकरवी गावातील विविध वाड्यावरील गणपतींची उत्तरपूजा झाल्यानंतर घरोघरी छोट्या- मोठ्या गटात घूमट आरत्या सुरू झाल्या. महिला व मुलींनी फुगड्या घातल्या. युवकांनी मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी केली. गणपती बाप्पाला निरोप देण्यासाठी युवक , ज्येष्ठ तसेच महिलांसह लहान मुलेही आनंदाने सहभागी झाली होती.



साळ: गणेशमूर्ती विसर्जनास घेऊन जाताना भाविक.